Vol III Issue IX March 2014 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-3 | Issue-9 | March-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# *सहकार पर्यटन – वारणा सहकार समूह प्रारूप*

*दिनेश पाटील*

सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, श्रीपतराव चौगुले महाविद्यालय, माळवाडी–कोतोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

***सारांश :-***पर्यटन म्हणजे लोकांचे त्याच्या नेहमीच्या राहत्या ठिकाणाहून विशिष्ठ भूमिकेतून झालेले अल्पकालीन स्थलांतर होय. पर्यटन जागतिक अर्थव्यवस्थेत निर्णायक योगदान देवू शकते हे अनेक देशांनी सिध्द केले आहे. देशाच्या अर्थकारणात पर्यटन उद्योगाचे योगदान महत्वपूर्ण ठरू शकते. रोजगार निर्मितीचे एक नवे क्षेत्र म्हणून जगभर या क्षेत्राकडे पाहिले जाते. या उद्योगातून शिक्षित–अशिक्षित बेरोजगारांना मोठया प्रमाणावर रोजगाराची संधी उपलब्द होवू शकते. आज पर्यटनाबाबतच्या पारंपारिक संकल्पना लोप पावत असून कृषी पर्यटनासारखी अनेक नवीन क्षेत्रे या उद्योगासाठी फायदेशीर ठरत आहेत.

### *प्रस्तावना :-*

भारतीय अर्थव्यवस्था सध्या अतिशय मुलभूत बदलातून वाटचाल करीत आहे. 8 टक्के इतका वार्षिक आर्थिक वृध्दी दर असणारा भारत परदेशी गुतवणूकीसाठी दुसऱ्या क्रमांकाचा देश म्हणून पुढे येत आहे. सेवा क्षेत्रातील एक आर्थिक क्रिया म्हणून 'पर्यटन उद्योगाला' देशाच्या आर्थिक वृध्दीत योगदान देण्याची मोठी संधी उपलब्ध होत आहे. पर्यटन उद्योगाच्या माध्यमातून त्या–त्या विभागाचा आर्थिक चेहरा–मोहरा बदलू शकतो. नियोजनबध्द पध्दतीने या क्षेत्राच्या विकासाला गती दिली तर अनेक मार्गांनी विविध समाज घटकांना याचा लाभ मिळू शकतो. रोजगार निर्मिती, खाजगी उद्योग, जीवनमान सुधारणे, सामाजिक गतीशिलता, चांगले शिक्षण आणि प्रशिक्षण, परकीय चलन वृध्दी आदी फायदे मिळू शकतात.

जगातील एक मोठा उद्योग म्हणून पर्यटन उद्योगात धार्मिक पर्यटन, साहस पर्यटन, शैक्षणिक पर्यटन, सागरी पर्यटन, पर्यावरणीय पर्यटन आदि क्षेत्रांचा समावेश होतो. यामध्ये 'कृषी संलग्न पर्यटन' हे अतिशय वेगाने विकसीत होणारे क्षेत्र आहे. भारता सारख्या शेती केंद्री समाजासाठी कृषी आणि संलग्न पर्यटन हा आर्थिक विकासाचा आणि रोजगार निर्मितीचा एक प्रभावी मार्ग ठरू शकतो. 'पर्यटन विकासातून ग्रामीण विकास' हे सुत्र देशाच्या कृषी क्षेत्राला नवसंजीवन देणारे ठरेल.

कृषी संलग्न पर्यटनाच्या अनुषंगाने 'सहकार पर्यटन' हे एक अपवादात्मक परंतू विकासाभिमूख प्रारूप महत्वाचे आहे. 'वारणा सहकारी विविध उद्योग आणि शिक्षण समुह' हा कोल्हापूर जिल्हयातील सहकारातून विकसीत झालेला आणि 83 खेडयांच्या विकासाला गती देणारा सहकार समुह आहे. 24 फेब्रुवारी 2010 मध्ये हा समुह 50 वर्षे पुर्ण करीत आहे. सहकाराच्या माध्यमातून सर्वांगिण ग्रामीण विकासाचे एक नवे प्रारूप या समुहाने विकसीत केले. या विकासाचा अभ्यास करण्यासाठी तसेच तो पहाण्यासाठी देश–विदेशातून दरवर्षी हजारो लोक येथे येतात. सहकारातून झालेला विकास समजून घेणे हा या पर्यटनाचा मुख्य उद्देश असल्याने पर्यटनाचा एक नवा प्रकार म्हणून याचा विचार करावा लागेल.

### *1.2 उद्दिष्टे*

1.ग्रामीण विकासाचे 'सहकार प्रारूप' म्हणून वारणा सहकार समुहाचे महत्व अभ्यासणे.
2.वारणा सहकार समुहाचे 'सहकार पर्यटन' केंद्र म्हणून असणारे वेगळेपण अधोरेखित करणे.
3.जागतिक पर्यटन केंद्र या दृष्टीने वारणा सहकाराच्या योगदानाची नोंद घेणे.
4.'वारणा सहकार समुह' एक व्यावसायिक पर्यटन केंद्र म्हणून अद्ययावत स्वरूपात विकसीत करण्यासाठी उपाय सुचविणे.

### *1.3 अभ्यासक्षेत्र*

प्रस्तुत संशोधनासाठी वारणानगर या वारणा विविध उद्योग आणि शिक्षण समुहाच्या केंद्राची निवड केली आहे. वारणानगर हे

कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळा तालुक्यातील कोडोली ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील आणि वारणा नदीच्या उजव्या काठावरील 1959 नंतर उदयाला आलेले ठिकाण आहे. वारणा सहकार समुहाचे कार्यक्षेत्र पन्हाळा तालुक्याबरोबरच हातकणंगले व सांगली जिल्हयातील वाळवा आणि बत्तीस शिराळा या तालुक्यातील 83 खेडयांचे मिळून तयार झाले आहे. या 4 तालुक्यातील हजारो कुटुंबांच्या सर्वांगिण प्रगतीत वारणा समूहाचे अनन्य साधारण योगदान आहे.

### *1.4 सहकार पर्यटन – संकल्पना*

सहकार पर्यटन हा पर्यटनातील एक नवीन आणि अपवादात्मक प्रकार आहें सहकारातून निर्माण झालेले विकास कार्य समजून घेण्यासाठीचे पर्यटन. या स्वरूपाचे पर्यटन अपवाद वगळता रूढ नाही. वारणा सहकार पर्यटन केंद्र हे ग्रामीण पर्यटनाचेच एक स्वतंत्र क्षेत्र आहे. वारणानगर येथे सहकाराच्या माध्यमातून विविध कृषी प्रक्रिया आणि कृषी पूरक उद्योग, महिला उद्योग या बरोबरच शैक्षणिक केंद्र, वैद्यकिय आदि सुविधांचा विकास टप्या–टप्याने कसा होत गेला याबाबतचे कुतूहल घेवून पर्यटक येतात त्याचबरोबर त्याचा लाभही घेतात. म्हणूनच याला सहकार पर्यटन असे म्हणता येईल. सहकार पर्यटनाचे 'वारणा प्रारूप' अभ्यासल्यानंतरच सहकार पर्यटन ही संकल्पना अधिक स्पष्ट होवू शकते. सहकार पर्यटनात इतर प्रकाराप्रमाणे फक्त विरूंगळा अथवा करमणूक एवढाच उद्देश नसतो, तर मानवी प्रयत्नातून समाजाच्या सर्वांगिण विकासाची बांधणी आणि त्याचे यश समजून घेण्याची ओढ अशा पर्यटनात असते.

### *1.5 पर्यटन उद्योग – भारत*

सन् 2006–07 मध्ये भारताच्या दरडोई उत्पन्नात पर्यटन उद्योगाचा वाटा 5.3 टक्के इतका होता. देशाच्या पर्यटन उद्योगाचा विचार करता 367 अब्ज देशांतर्गत पर्यटक तर 3.97 अब्ज आंतरराष्ट्रीय पर्यटकांचा यामध्ये सहभाग आहे. पर्यटन उद्योगातून देशाला 25 हजार कोटीचे उत्पन्न मिळते. या उद्योगाची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती क्षमता 38.8 अब्ज इतकी आहे. सन् 2003 मध्ये भारताचा जागतिक पर्यटन उद्योगातील वाटा 0.39 टक्के तर जागतिक पर्यटन उद्योगात भारत 53 व्या स्थानावर होता-(Indian Tourisim Statastics-2003, P.4)

भारतामध्ये पर्यटन उद्योगासाठी भरपूर संधी आहे. भारत हा अनेक धर्मांची मातृभूमी असून जागतिक दर्जाची अनेक तीर्थस्थाने देशभर विखुरलेली आहेत. एफआयसीसीएम–फर्ग्युसन आणि कंपनीच्या 2004 च्या अभ्यासावरून असे दिसून आले की, प्रत्येक 30 अब्ज पर्यटक 4300 कोटी रूपयांचा महसूल देतात. कृषी पर्यटन विकसीत झाले तर मोठया प्रमाणावर महसूल निर्माण होवू शकतो. गेल्या 15 वर्षात पर्यटन उद्योग 304 अब्जापासून (1990) वाढून 367 अब्जापर्यंत म्हणजेच वार्षिक 20 टक्के वेगाने विस्तारत आहे. (एटीडीसीचा अभ्यास)

जागतिक वाहतूक आणि पर्यटन समितीने भारताला वेगाने वाढणाऱ्या पर्यटन अर्थव्यवस्थेतील पहिल्या पाच पैकी एक असे स्थान दिले आहे. भारतातील पर्यटन उद्योगाचा विचार करता एकूण परदेशी पर्यटकांपैकी 27 टक्के पर्यटक भारतातील भौगोलिक घटकांच्या आकर्षणातून पर्यटनासाठी येतात. तर 54 टक्के पर्यटक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक घटकांमुळे आकर्षित होतात. 1 मार्च 1958 मध्ये भारत सरकारने वाहतूक मंत्रालयातर्गत स्वतंत्र 'पर्यटन मंत्रालयाची' स्थापना केली. तर 1966 मध्ये झा समितीच्या अहवालानुसार 'भारतीय पर्यटन विकास महामंडळ' स्थापन झाले. 2002 मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय पर्यटन धोरण जाहीर केले.

10 व्या पंचवार्षिक योजनेनुसार देशातील पर्यटन उद्योगाच्या विकासासाठी केंद्र शासनाने 2900 कोटी रूपये इतकी तरतूद 5 वर्षासाठी केली आहे. तर राज्य पर्यटन विकासासाठी केंद्र सरकारकडून 765 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. भारतातील पर्यटन उद्योग गेल्या 5 वर्षात झपाटयाने वाढत आहे. भारतात येणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण 25 टक्क्यांनी तर परदेशी चलनाचे प्रमाण 40 टक्क्यानी वाढले आहे. कोडे–नेस्ट ट्रॅव्हलरच्या सर्वेक्षणानुसार फ्रान्स, सिंगापूर आणि स्विर्झलॅड प्रमाणेच भारतालाही पर्यटकांची पसंती आहे.

### *1.6 पर्यटन उद्योग–महाराष्ट्र*

ग्रामीण पर्यटन, कृषी पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, वाईन पर्यटन इ. द्वारे महाराष्ट्रातील पर्यटन क्षमता आणि विविधता यांचा विकास अग्रक्रमाने करण्याचे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. महाराष्ट्र हे देशातील विस्तार आणि लोकसंख्येच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्र भारताच्या पश्चिम किनारपटटी लगत असून, 720 कि.मी. चा समुद्र किनारा लाभला आहे. हिरवागार कोकण, सह्याद्रीची पर्वत रांगांमध्ये वसलेली अनेक गिरीस्थाने, झरे तसेच अंशतःसदाहरीत जंगले येथे आहेत. घनदाट जंगलाने व्यापलेला विदर्भ आणि अनेक हिंस्त्र प्राण्यांचे वास्तव्य, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने येथे आहेत. अशाप्रकारे महाराष्ट्राच्या तिन्ही विभागात पर्यटन अनुकूल परिस्थिती आहे.

प्राचीन गुहा, मंदीरे, स्वच्छ सागर किनारा, प्राचीन किल्ले, पर्वत, दुर्मिळ प्राण्यांची वस्तीस्थाने, अद्वितीय गिरिस्थाने, धार्मिक स्थळे याच बरोबर उत्सव, कला आणि संस्कृतीची उज्वल परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. म्हणूनच महाराष्ट्र शासनाचे पर्यटन घोषवाक्य आहे 'महाराष्ट्र अमर्याद' (Maharashtra Unlimited).

गेल्या दशकात देशांतर्गत पर्यटकांचे महाराष्ट्राला भेट देण्याचे प्रमाण दुप्पट झाले आहे. (1991 मध्ये 41.29 लाख तर 2001 मध्ये 84.8 लाख) त्याचबरोबर परदेशी पर्यटकांचे मुंबईला भेट देण्याचे प्रमाण 1991 मध्ये 7 अब्ज होते ते 2001 मध्ये 8 अब्ज झाले. 1969 मध्ये 'महाराष्ट्र पर्यटन संचलनालय' स्थापन करण्यात आले. 1975 मध्ये 'महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाची' स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने पर्यटन विकासाला चालना मिळाली. महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांचे प्रामख्याने 1. राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये 2. वनौद्याने 3. धार्मिक पर्यटन स्थळे 4. ऐतिहासिक पर्यटन स्थळे 5. थंड हवेची ठिकाणे अशी वर्गवारी करता येईल.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन धोरण 2006 नुसार, खाजगी क्षेत्र, राज्य शासन / संयुक्त क्षेत्र आणि सहकार क्षेत्राद्वारे पर्यटन उपक्रमांना

चालना देण्याचे निश्चित केले गेले. या धोरणानुसार सिंधुदुर्ग जिल्हा 'पर्यटन जिल्हा' म्हणून घोषित करण्यात आला.

मध्यम वर्गाचे वाढते प्रमाण हे देशांतर्गत पर्यटन वाढीचे एक प्रमुख कारण मानण्यात येते. त्याचबरोबर सुविधा विकास, शहरातील लोकांवरील वाढता ताण, पर्यटन स्थळांच्या संपर्क यंत्रणेत झालेली वाढ आदी इतर कारणांचा यामध्ये समावेश होतो. महत्वाचे म्हणजे परदेशी पर्यटक प्रथम मुंबईत येतात आणि नंतर विविध राज्यातील विविध ठिकाणी जातात. या पर्यटकांना महाराष्ट्राकडे आकृष्ट करण्याची खरी गरज आहे.

### *1.7 पर्यटन उद्योग– कोल्हापूर जिल्हा*

पद्मपुराण व स्कंद पुराण या प्राचीन ग्रंथात वर्णन केलेले दक्षिण काशी (करवीर) म्हणजेच आजचे कोल्हापूर. प्राचीन काळापासून कोल्हापूरचा प्रवास पहाता हिंदू कालखंड 1347 मध्ये संपला व मुस्लिम राजवट 1347 पासून छत्रपती शिवाजी महाराजांनी कोल्हापूर अदिलशाहीकडून 1675 मध्ये जिंकून घेईपर्यंत होती. 1708 मध्ये महाराणी ताराबाईनी आपली राजधानी येथे स्थापन केली. या स्थळाला छत्रपती शिवाजी, राजर्षि शाहू यांनी अनेक सुधारणा करून प्रसिध्दी दिली. मराठयांचे या प्रांतावर 1700 ते 1849 या कालखंडात प्राबल्य होते.

1849 मध्ये ब्रिटीशांनी हा प्रांत ताब्यात घेवून छत्रपती शिवाजी महाराजांना गादीवर बसविले. शाहू महाराजांनी कोल्हापूरला फार मोठा लौकिक मिळवून दिला. नाटक, चित्रपट, संगीत, चित्रकला, शिल्पकला, कुस्ती, हस्तकला, उद्यमनगरी, शिक्षण, आरोग्य, सिंचन आदि सर्व क्षेत्रात कोल्हापूरने केलेली प्रगती ही शाहु महाराजांच्या कार्याची साक्ष आहे. यामुळेच एक 'सांस्कृतिक परंपरा असलेले शहर' म्हणून कोल्हापूर प्रतिष्ठित आहे. 1945 मध्ये पुरातत्व विभागाने केलेल्या उत्खननात 'ब्रह्मगिरी' हे पंचगंगा नदी काठावरील प्राचीन, रोमन काळातील शहर असल्याचे स्पष्ट झाले.

शिवाजी विद्यापीठ, खासबाग मैदान, अनेक राजवाडे, जयप्रभा स्टुडिओ, विविध शिक्षण संस्था यांनी कोलपूर समृध्द आहे. येथील गुळ बाजारपेठ देशात प्रसिध्द आहे. पंचगंगा नदीच्या काठावर वसलेले कोल्हापूर राज्यातील तीन/साडेतीन शक्ती पीठांपैकी एक असून येथील अंबाबाई मंदीर प्रसिध्द आहे. येथून जवळच जोतिबा हे तीर्थस्थान व पन्हाळा किल्ला पर्यटकांना आकर्षित करतो. याचबरोबर कोल्हापूर नजीक असलेले वारणानगर ही सुध्दा पर्यटकांचे आकर्षण आहे.

मराठयांच्या इतिहासातील प्रसिध्द पन्हाळा, विशाळगड किल्ला व तेथील अमृतेश्वर मंदीर, टकमक टोक, सतीवृदांवन, व हजरत मल्लीकरिहान बाबांचा दर्गा प्रसिध्द आहे. गडहिंग्लज तालुक्यातील सामानगड, भुदरगड तालुक्यातील भुदरगड किल्ला, चंदगड तालुक्यातील पारगड, शिरोळ तालुक्यातील कृष्णा आणि पंचगंगेच्या संगमावरील नरसोबाची वाडी हे दत्तात्रयांचे प्रसिध्द ठिकाण, समुद्र सपाटीपासून 3100 फूट उंचीवर वसलेले वाडीरत्नागिरी हे जोतिर्लिंगांचे प्रसिध्द तीर्थस्थान, जैन धर्मियांचे पवित्र ठिकाण कुंभोजगिरी येथील बाहुबली, खिद्रापुरची लेणी व तेथील महादेव मंदीर, गव्यासाठी प्रसिध्द दाजीपूर अभयारण्य, आंबा व अंबोली हे थंड हवेची ठिकाणे, कोल्हापुर महालक्ष्मी मंदीर, टाऊन हॉल वस्तू संग्रालय, रंकाळा तलाव ही कोल्हापूर शहर व जिल्हयातील प्रसिध्द पर्यटन स्थळे आहेत. कोल्हापूर जिल्हा हा पर्यटन स्थळांचा जिल्हा आहे. दरवर्षी हजारो पर्यटक कोल्हापूरला भेट देतात. पर्यटन उद्योगाच्या विकासाला येथे फार मोठी संधी आहे. योग्य नियोजन केले तर जगाच्या पर्यटन नकाशावर कोल्हापूर जिल्हा आपले स्थान निर्माण करू शकतो.

### *1.8 वारणा सहकारी विविध उद्योग आणि शिक्षण समूह – ऐतिहासिक आढावा*

वारणानगर हे कोल्हापूरपासून 30 किलोमीटर अंतरावरील कोल्हापूर जिल्हयातील वायव्य दिशेला वसलेले एक ठिकाण आहे. 1959 मध्ये वारणा सहकारी साखर कारखान्याच्या निर्मितीनंतर हे ठिकाण आकारास आले. आज वारणा सहकार चळवळीचे केंद्रस्थान म्हणून ते जगप्रसिध्द आहे. 2010 मध्ये हा समूह सहकाराचा सुवर्णमहोत्सव साजरा करीत आहे. स्वर्गीय विश्वनाथ आण्णा तथा तात्यासाहेब कोरे यांच्या दृष्टया नेतृत्वाखाली 27 सप्टेंबर 1955 मध्ये वारणा सहकारी साखर कारखान्याची नोंदणी झाली आणि 1959 साली या कारखान्याचा पहिला गळीत हंगाम सुरू झाला. फक्त साखर कारखाना सुरू करून आर्थिक सुबत्ता निर्माण करणे एवढाच त्यांचा उद्देश नव्हता, तर ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, आधुनिकता, शालिनता, चारित्र्य, सुजानता आणि राष्ट्रीयता यांचा मानदंड असणारा नवा माणूस घडविण्याचा संकल्प हीच तात्यासाहेब कोरे यांची प्रेरणा होती. वारणा परिसरात सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून लोकांचे जीवनमान उंचावण्याच्या भूमिकेतून सहकाराचा अवलंब त्यांनी केला. साखर उद्योगात फक्त ऊस उत्पादक शेतकरीच सहभागी होता. अल्पभूधारक व भूमिहीन लोकांना सहकाराच्या माध्यमातून विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेण्याची त्यांची भूमिका होती.

सहकारी साखर कारखाना या मातृ संस्थेबरोबरच दूध उद्योग, फळ प्रक्रिया उद्योग, बँक, कागद उद्योग, सहकारी ग्राहक भांडार (वारणा बझार), सर्व प्रकारचे शिक्षण देणारा शिक्षण संकूल, सत्कार्य संवर्धन मंडळ, वाचनालय, व्यायाम शाळा, वारणा विभाग शेती पूरक व शेती प्रशिक्षण संस्था, बालवाद्यवृंद , सहकारी जलविद्युत, जनसुराज्यशक्ती हा राजकीय पक्ष, सुराज्य फौंडेशन ही सामाजिक संस्था, चैतन्य मतीमंद मुलांची शाळा आदि. विविध सहकारी व पूरक संस्थांचा विकास 50 वर्षाच्या सहकार चळवळीतून वारणा समूहाने साध्य केला आहे. कोल्हापूर व सांगली जिल्हयातील 83 खेडयातील लाखो लोकांच्या विकासात निर्णायक योगदान देणाऱ्या या समुहाची वार्षिक उलाढाल 2000 कोटींहून अधिक आहे.

तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेली सहकार चळवळ तात्यासाहेबांच्यानंतर त्यांचे सुपूत्र आणि कृषी तंत्रज्ञानाचा ध्यास घेतलेले स्व.विलासराव कोरे यांनी गतीमान केली. तर सध्या कोरे परिवारातील तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधी आणि तात्यासाहेब कोरे यांचे नातू व विलासराव कोरे यांचे सुपूत्र आ. विनयजी कोरे (सावकर) यांच्या जागतिक स्पर्धेचे भान असणाऱ्या नेतृत्वाखाली सहकारातील अनेक नवे उपक्रम राबवित आहे.

### 1.तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना

1951 मध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेले आव्हान आणि त्यातून शेतकऱ्यांनी आपला ऊस पेटवून देण्याचा घेतलेला निर्णय हीच या कारखान्याच्या निर्मितीला प्रेरणा देणारी घटना ठरली. गुळाला मिळालेला अतिशय कमी भाव विचारात घेवून ऊसापासून साखर तयार करण्याचा आधुनिक कारखाना सुरू करण्याचा संकल्प तात्यासाहेब कोरे यांनी 1954 मध्ये केला. वारणा परिसरातील जवळ–जवळ 83 खेडयातील शेतकऱ्यांना या कारखान्याची गरज त्यांनी पटवून दिली. शेतकऱ्यांच्या आर्थिक सहभागातून शेतकऱ्यांच्या मालकीचा साखर कारखाना ही संकल्पना या परिसरासाठी वरदान ठरली.

1959 मध्ये 1000 मेट्रीक टन गाळप क्षमता असणाऱ्या या कारखान्याने 2010 मध्ये 9000 हजार मेट्रीक टन क्षमतेपर्यत प्रगती केली. 5000 रूपयाचे 30,000 शेअर्स असणाऱ्या या कारखान्याचे भागभांडवल 15 कोटी आहे. या पैकी 29, 250 उत्पादक शेतकरी सभासद तर 750 अनुत्पादक सभासद आहेत. सध्या 22,500 उत्पादक सभासद आणि 300 अनुत्पादक सभासद आहेत. अर्धा एकर जमिन असणारा शेतकरी कारखान्याचा सभासद होवू शकतो. तर आर्थिक दृष्टया दुर्बलांसाठी 10 गुंटे व मागास वर्गीयांसाठी 5 गुंटे जमिन मालकी असणाऱ्या शेतकऱ्यांना सभासदत्व दिले आहे. 86 टक्के सभासद हे छोटे आणि अल्पभूधारक शेतकरी आहेत. वारणा सहकारी समूहाची मातृ संस्था अशी या संस्थेची ओळख आहे.

देशातील उच्चांकी ऊस गाळप व साखर निर्यात करणारा कारखाना म्हणून हा कारखाना ओळखला जातो. महाराष्ट्रातील 4 बंद सहकारी साखर कारखाने या कारखान्याच्या व्यवस्थापनाखाली नव्याने सुरू करून स्थानिक विकासाला या कारखान्याने चालना दिली. शुगर रिफायनरी, बगॅसपासून कागद निर्मिती, प्रेसमड पासून बायोडिझेल, ऊसाच्या मळीपासून औद्योगिक अल्कोहोल, प्रेसमड व स्पेंन्ट वॉश पासून बायोअर्थ (खत), बगॅसपासून सोडीअम लिग्नोसल्फोनेट, प्रायोगिक शेती फार्म, शेती प्रयोग शाळा, गांडूळ खत, सेंद्रीय खते आदि प्रकल्प. 'ऊर्जांकूर' निधीतून 44 मेगावॅट सहविद्युत प्रकल्प. संगणकाद्वारे माहिती सेवा देणारा आशिया खंडातील पहिलाच वारणा वायर्ड व्हिलेज प्रकल्प, देश–विदेशात साखर व उपउत्पादने तयार करणारी कंपनी श्री वारणा शुगर्स् लि. परिसरातील सर्व क्षेत्र ओलिताखाली आणणाऱ्या 59 सहकारी उपसा जलसिंचन योजना आदि विविध योजना कारखान्याकडून राबविल्या जातात. कारखान्याने आजअखेर अनेक राष्ट्रीय पुरस्कारांसह विविध पुरस्कार संपादन केले आहेत.

### 2.वारणा सहकारी कुक्कूटपालन संस्था

1963 मध्ये सहकारी तत्वावर कुक्कूटपालन करणारी ही संस्था आर्थिक स्थैर्य देणारा एक पूरक उद्योग म्हणून स्थापन झाली. 60 हजार पक्षी व दिवसाला 50 हजार अंडी उत्पादन अशी या संस्थेची क्षमता आहे. ही संस्था परिसरातील छोटया उद्योजकांना कुक्कूटपालन संदर्भात मार्गदर्शन व सहकार्य करते.

### 3.श्री वारणा सहकारी बँक

कोणत्याही स्वरूपाच्या विकासात आर्थिक पाठबळ हा महत्वाचा घटक असतो. वारणा परिसराच्या सर्वांगिण विकासात मौलिक योगदान देणाऱ्या या संस्थेची स्थापना 1966 मध्ये झाली. 222 कोटींच्या ठेवी आणि 147 कोटींचा कर्ज पुरवठा ही संस्था करते. सध्या सर्व संगणकीकृत शाखांद्वारे संस्था वाटचाल करत आहे.

### 4.श्री वारणा सहकारी दूध उत्पादन प्रक्रिया संघ

सहकारी साखर कारखान्यामुळे फक्त शेतकऱ्यांच्या विकासाला चालना मिळाली. परंतू परिसरातील भूमिहीन व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देण्याच्या उद्देशाने 1968 मध्ये ही संस्था सुरू झाली. वारणा तूप, वारणा श्रीखंड, स्ट्रॉबेरी, आम्रखंड, दूध पावडर, लस्सी, बटर आदि दूधजन्य पदार्थ निर्मितीतील देशातील एक अग्रगण्य संस्था असा या संस्थेचा लौकिक आहे. सध्या 15,520 दूध उत्पादक सभासदांसह 1,25,000 बिगरसभासद उत्पादकांकडून दैनिक 3 लाख लिटर दूध संस्थेकडे जमा होते. वारणा मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस् लि., चा चॉकलेट व बोर्नविटा तयार करणारा मोठया क्षमतेचा प्रकल्प येथे सुरू आहे. टेट्रा पॅक्ड ऊसाचा रस व दूध देश–विदेशातील ग्राहकांसाठी उपलब्ध आहे.

### 5.वारणा बझार

खाजगी व्यापाऱ्यांकडून ग्राहकांचे होणारे शोषण थांबवून ग्राहकांना दर्जेदार वस्तू व सेवा पुरविण्याच्या उद्देशाने 1978 मध्ये आशिया खंडातील ग्रामीण परिसरातील पहिले सहकारी ग्राहक भांडार म्हणून ही संस्था सुरू झाली. दोन मुख्य शाखांबरोबर 50 शाखा व 7 फ्रँचाईजीद्वारे कोल्हापूर व सांगली जिल्हयात ग्रामीण विभागात संस्था सेवा देत आहे. सध्या या संस्थेची वार्षिक आर्थिक उलाढाल 80 कोटींच्या वर आहे. 78 टक्के महिला सभासद हे या संस्थेचे खास वैशिष्ठ होय.

### 6.श्री वारणा ॲग्रीकल्चरल गुडस् प्रोसेसिंग कोऑपरेटीव्ह सोसायटी

स्व. विलासराव कोरे यांचे स्वप्न असणारी ही संस्था 1987 मध्ये स्थापन झाली. आंबा, केळी, पेरू, पपई आदि फळांचे पल्प आणि प्युरीचे

100 टक्के निर्यातक्षम उत्पादन या संस्थेचे खास वैशिष्ठ. या संस्थेसाठी आवश्यक फळांची उपलब्दता होण्यासाठी परिसरातील शेतकऱ्यांना टिश्यूकल्चर्ड फळांची रोपे उपलब्ध करून दिली जातात. या संस्थेचा उभारणी खर्च 45 कोटी असून क्रेडीट बँक, बेल्जीअमकडून अंशतः वित पुरवठा केलेली देशातील ही पहिली संस्था आहे.

### 7.तात्यासाहेब कोरे सहकारी दूध व साखर वहातूक संस्था

वारणा सहकारी समूहाची दळणवळणाची गरज भागविणारी ही संस्था 1995 मध्ये स्थापन झाली. या संस्थेद्वारे दूध, साखर, पशुखाद्य, इथेनॉल, मोलॅसीस आदींची वहातूक केली जाते. सध्या या संस्थेकडे 250 मालवाहू वहाने असून संस्थेची वार्षिक उलाढाल 50 कोटींच्यावर आहे. संस्थेच्या माध्यमातून जोतिबा ते पन्हाळा रोप–वे चा 16 कोटींचा प्रकल्प उभारला जात आहे. त्यामुळे पर्यटन विकासाला चालना मिळेल.

### 8.तात्यासाहेब कोरे वारणा विभाग षेती पूरक व षेती प्रषिक्षण सहकारी संस्था

शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी 2000 साली ही संस्था स्थापन झाली. या संस्थेद्वारे शेतकऱ्यांना खते, वित, शेतीप्रशिक्षण व मार्गदर्शन आदि सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. अशाप्रकारची ही देशातील पहिलीच संस्था आहे. या संस्थेद्वारे रासायनिक खते, किटकनाशके, पिक कर्ज आदि सुविधा साखर कारखान्याच्या सभासद शेतकऱ्यांना दिल्या जातात. या संस्थेकडून खत स्वरूपात पिक कर्ज, रोख कर्ज आणि उधारीवर प्राथमिक सेवा संस्थांना खत पुरवठा केला जातो.

जैन इरिगेशन सिस्टिम, जळगांव आणि वारणा सहकारी साखर कारखाना यांच्या संयुक्त विद्यमाने ठिबक सिंचन योजना राबविले जाते. कृषी प्रदर्शनासारखे उपक्रमही संस्था राबविते. संस्थेच्या 13 हजार सभासदांसाठी सन् 2009–10 मध्ये 1 लाखापर्यंतचा अपघात विमा योजना राबविली जाते.

### 9.श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी नवषक्ती निर्माण संस्था

सहकारातील एक महत्वाकांक्षी संस्था म्हणून या संस्थेकडे पाहिले जाते. 'सहकाराचा सहकार' या प्रारूपानुसार वारणा सहकार समुहातील सर्व सहकारी संस्थानी मिळून ही बहुराज्यीय संस्था 2005 मध्ये स्थापन केली. या संस्थेकडून सहकारी तत्वावर जलविद्युत निर्मिती केली जाते. सध्या कोल्हापूर जिल्हयातील 6 धरणांवर संस्थेचे प्रकल्प सुरू आहेत. सदर प्रकल्प महाराष्ट्र शासनाकडून 'बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा' या तत्वावर सुरू आहेत. वारणा सहकार समुहाचे विजेची गरज भागविण्याबरोबरच देशाची ऊर्जा गरज भागविणे हे या संस्थेचे ध्येय आहे. वरील 6 प्रकल्पांची एकत्रित ऊर्जा निर्मिती क्षमता 10.6 मेगावॅट इतकी आहे.

### 10.श्री वारणा विभाग षिक्षण मंडळ

वारणा परिसरातील शिक्षणाचा प्रश्न सोडविण्याच्या उद्देशाने 1964 मध्ये वारणा विभाग शिक्षण मंडळ ही संस्था वारणा सहकार समूहाकडून स्थापन झाली. बालवाडीपासून ते पदव्युत्तर स्तरापर्यंतच्या विविध ज्ञान शाखांचे शिक्षण या संस्थेकडून दिले जाते. 1964 मध्ये श्री वारणा महाविद्यालयाच्या स्थापनेने वारणा परिसरातील शैक्षणिक विकासाला सुरूवात झाली. त्यानंतर वारणा विद्यालय हे गुरूकूल पध्दतीचे हायस्कूल सुरू झाले. इंजिनिअरींग कॉलेजच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर, मेकॅनिकल, केमिकल, माहिती तंत्रज्ञान, सिव्हील व बायोटेक्नॉलॉजी या विषयातील पदवी व इलेक्ट्रॉनिक्स व केमीकल या विषयातील पदव्युत्तर शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. कला, वाणिज्य व विज्ञान या तीन विभागाचे 11 वीपासून पदवीपर्यंतच्या शिक्षणाबरोबर व्यावसायिक शिक्षणाची सुविधा व मराठी, अर्थशास्त्र व इतिहास या विषयातील पदव्युत्तर शिक्षण येथे उपलब्ध आहे.

व्यवसायिक शिक्षण घेवून स्वतःचा उद्योग सुरू करता यावा यासाठी शिक्षण मंडळाकडून औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आली. त्याचबरोबर परिसरातील विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून तात्यासाहेब कोरे ट्रेनिंग कम प्रॉडक्शन सेंटर सुरू झाले. या सेंटरकडून विविध प्रकारचे फर्निचर तयार केले जाते. फार्मसीमधील पदवी व पदवीका विभागही सुरू करण्यात आला आहे. तसेच बी.एड. महाविद्यालयही सुरू करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील तरूणांना देशसेवा करण्याची प्रेरणा मिळावी व जास्तीत जास्त तरूण सैनिकी क्षेत्रात सहभागी व्हावेत म्हणून 5 ते 12वी पर्यंतचे शिक्षण देणारी जिल्हयातील एकमेव निवासी सैनिकी शाळा संस्थेकडून चालविली जाते. वारणा शिक्षण समुहात सध्या 7 हजारहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

### 11.महात्मा गांधी मेडिकल ट्रस्ट

वारणा परिसरातील लोकांना मुलभूत आरोग्य विषयक सेवा तसेच पदवी व पदव्युत्तरनंतरचे आरोग्य शिक्षण प्राप्त व्हावे या दृष्टीकोनातून सहकारमहर्षि आदरणीय तात्यासाहेब उर्फ विश्वनाथ आण्णा कोरे यांनी सन् 1977 साली महात्मा गांधी चॅरिटेबल मेडिकल ट्रस्ट या संस्थेची स्थापना केली. कारखान्याकडील विभाग विकास निधीतून तसेच वारणा दूध संघ, वारणा बँक इत्यादी संस्थाकडील आर्थिक सहकार्यावर चालणाऱ्या या संस्थेचा शुभारंभ 2 ऑक्टोंबर 1992 रोजी झाला.

ग्रामीण भागातील जनतेच्या वैद्यकीय सेवेसाठी 200 कॉटचे हे हॉस्पिटल 24 तास कार्यरत असते. यासाठी अनुभवी डॉक्टर, नर्सेस, स्टाफ, अत्याधुनिक वैघकीय उपकरणे मेडिकल ट्रस्टकडे उपलब्ध आहेत. या सेवेबरोबरच कार्यक्षेत्रातील गावात तसेच महात्मा गांधी

हॉस्पिटलमध्येही वेळोवेळी मोफत वैद्यकीय शिबीरे आयोजित केली जातात. अशा शिबीराच्या वेळी बाहेरील तज्ञ डॉक्टर बोलावून मोफत तपासणी व उपचारही केले जातात. कारखाना कार्यक्षेत्रातील काही गावात ओ.पी.डी. विभागही सुरू करण्यात आले आहेत. तसेच एक ब्लड बँक कार्यरत आहे. ट्रस्टद्वारे सुसज्ज दंत महाविद्यालयामुळे सर्वसामान्य सभासदांना तसेच वारणा परिसरातील लोकांना कमीत कमी खर्चात दातांचे उपचार करणे सोईचे झालेले आहे. याच ठिकाणी 20 विद्यार्थीनींसाठी तात्यासाहेब कोरे नर्सिंग स्कूल तसेच डी.एम.एल.टी.कोर्स चालू करण्यात येत आहे.

### *12.महिला उद्योग*

वारणा परिसराच्या आर्थिक, सामाजिक व सर्वांगिण विकासामध्ये आणि विशेषतः महिलांच्या आर्थिक विकासामध्ये मोलाचा वाटा महिला संस्थांचा आहे. या महिला संस्थांमध्ये श्री वारणा भगिनी मंडळ, श्री वारणा महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्र, श्री वारणा महिला सहकारी पत संस्था, सावित्री महिला औद्योगिक सहकारी संस्था या संस्थांचा समावेश आहे. श्री वारणा भगिनी मंडळामार्फत लिज्जत पापड केंद्र चालविले जात असून या केंद्रामध्ये 500 हून अधिक भगिनी पापड लाटण्याचे काम करीत आहेत.

महिला सबलीकरण योजनेअंतर्गत नाबार्डच्या सहकार्यातून दुर्गम अशा भागात शेळी मेंढी पालन योजना राबवून त्या भागातील लोकांना नवीन रोजगार उपलब्ध करून दिला आहे. भजनी मंडळ, रेडिमेड विभाग, विविध खाद्य पदार्थाची निर्मिती, सांस्कृतिक कार्यक्रम, बालवाडी, आरोग्य शिबीरे असे विविध उपक्रमांबरोबरीने भगिनी मंडळाने मतिमंद मुलांची शाळा सुरू केली आहे. महिलांनी महिलांचेसाठी स्थापन केलेली वारणा महिला पत संस्था ही सहकारी संस्था असून 2006–2007 अखेर 2278 महिला सभासद आहेत. वार्षिक उलाढाल रू. 90 कोटींच्या वर आहे. सावित्री महिला औद्योगिक सहकारी संस्थेद्वारे लॉन्ड्री विभाग, पिठाची गिरणी, कंटेनर विभाग, पॉलिथिन विभाग, सकस आहार विभाग सुरू आहेत. संस्थेची सभासद संख्या 1718 असून वार्षिक आर्थिक उलाढाल 2 कोटी 11 लाख इतकी आहे.

### *13.श्री वारणा विभाग सत्कार्य संवर्धन मंडळ*

स्व.तात्यासाहेब कोरे यांच्या दूरदृष्टीने, प्रेरणेने वारणा सहकारी साखर कारखान्याच्या प्रमाणित अनुदानातून सन् 1969 पासून आजअखेर संस्था विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवित आहे. वारणा कारखाना कार्यक्षेत्रातील खेडयापाडयांमध्ये बालशिक्षणाची सुविधा पुरविणे, ग्रंथालय चळवळीस सक्रीय प्रोत्साहन देणे, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सामान्यज्ञान स्पर्धा आयोजित करणे यासारखे उपक्रम राबविले जातात.

### *14.वारणा बालवाद्यवृंद*

लहानपणापासूनच संगीताची आवड निर्माण होऊन या अविट संगीताच्या गोडीने जीवनात आनंद निर्माण व्हावा यासाठी कार्यरत असलेला वारणा बालवाद्यवृंद म्हणजे श्री वारणा सहकारी विविध उद्योग व शिक्षण समुहाचा अविभाज्य अंग आहे. छोटया मुलांच्या या बालवाद्यवृंदाने देश–विदेशात आपले एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. देश–विदेशातील अनेक मान्यवरांनी या वाद्यवृंदाचे कौतूक केले आहे. मॉरिशस, द.आफ्रिका, युगोस्लाव्हिया, दिल्ली, मुंबई यासह विविध ठिकाणी या वाद्यवृंदाचे कार्यक्रम सातत्याने होत असतात.

### *15.श्री वारणा व्यायाम मंदिर*

कार्यक्षेत्रातील तरूण युवकांमध्ये व शरीर सौष्ठवाची आवड निर्माण व्हावी व कुस्ती कलेची जोपासना करण्याच्या प्रेरणेने श्री वारणा व्यायाम मंदिराची स्थापना करण्यात आली. व्यायाम मंदिरामध्ये जीम्स व कुस्ती केंद्र असे दोन विभाग कार्यरत आहेत. जिम्स विभागामध्ये दररोज 100 ते 150 विद्यार्थी व्यायामाचा सराव करतात. कुस्ती विभागामध्ये सध्या 70 पैलवान आहेत. दरवर्षी वनज गटानुसार वारणा परिसरातील 6 पैलवानांची कुस्ती चाचणी निवड करून प्रथम विजेत्यांना मानधन दिले जाते. कै. तात्यासाहेब कोरे यांचे पुण्यतिथी दिनी दरवर्षी 13 डिसेंबर रोजी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कुस्त्यांचे जंगी मैदान आयोजित केले जाते.

### *16.श्री शारदा वाचन मंदिर*

साखर कारखान्याच्या माध्यमातून 1970 साली केवळ 100 पुस्तक संख्येवर सुरू झालेले हे वाचनालय आज विविध विषयावरील सुमारे 25,000 समृध्द ग्रंथसंपदेचे सुसज्ज व 'अ' वर्ग ग्रंथालयात झाले आहे. या ठिकाणी दररोज 23 वर्तमानपत्रे व 150 नियतकालिके येतात. सुमारे 200 हून अधिक वाचक या वाचन साहित्याचा आस्वाद घेत आहेत. श्री शारदा वाचन मंदिराचे वतीने दरवर्षी 1 ते 8 ऑगष्ट या कालावधीत वर्षा व्याख्यानमाला गेली 30 वर्षापासून अखंडपणे सुरू आहे. संपूर्ण पन्हाळा तालुक्यासह इतर तालुक्यात सुध्दा गाव तेथे ग्रंथालय उपक्रम राबविण्यात आला आहे.

### *17.सुराज्य फौंडेशन*

आजच्या सामाजिक व्यवस्थेमध्ये राजकारण आणि विकास यांचा विचार एकाच व्यासपीठावर मांडताना, राजकारण अधिक आणि विकास दुय्यम बनतो. या दुष्ट चक्रातून बाहेर पडण्यासाठी जनसुराज्यशक्ती या राजकीय पक्षाने संपूर्ण भारत देश कार्यक्षेत्र असलेल्या 'सुराज्य

फौंडेशन' या सर्व प्रकारच्या विकासाला वाहून घेतलेल्या पूर्णतः निःपक्ष व स्वतंत्र स्वयंसेवी संस्थेची स्थापना 2006 मध्ये आ. विनयजी कोरे (सावकर) यांनी केली.

संस्थेच्या माध्यमातून डिसेंबर 2009 अखेर 30,000 बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. डिसेंबर 2009 अखेर कोल्हापूर, सांगली, सोलापूर, यवतमाळ या जिल्हयांमधील 1 लाख जेष्ठ नागरिकांना महाराष्ट्र शासनाच्या वैकल्पिक जेष्ठ नागरिक ओळखपत्राचे वितरण, शालेयस्तरापासून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक मानसिकता विकसीत व्हावी या उद्देशाने देशातील पहिल्या हायस्कूल स्तरावरील 'सुराज्य स्पर्धा परीक्षा फाऊंडेशन कोर्स' या उपक्रमाचा लाभ कोल्हापूर, सांगली, सातारा, रायगड, सिंधुदूर्ग, यवतमाळ आदि जिल्हयातील शेकडो हायस्कूल्समधील हजारो विद्यार्थ्यांनी घेतला. या उपक्रमाचा भाग म्हणून दरवर्षी महाराष्ट्रातून आय.ए.एस. परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या यशवंतांचा वारणानगर येथे भव्य गुणगौरव सोहळयाचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमाची चित्रफित 'व्हिजन' या नावाने दरवर्षी तयार केली जाते.

देशातील पहिल्याच नॉलेज बँकेची स्थापना. नॉलेज क्लबच्या माध्यमातून समाजातील ज्ञान असणारे व ज्ञान नसणारे यांना जोडण्याचा महत्वाकांक्षी प्रयत्न, लोकांच्या आरोग्याचे संवर्धन व्हावे या उद्देशाने सुराज्य फौंडेशनच्या पुढाकाराने प. पू. श्रध्देय स्वामी रामदेवजी महाराज यांच्या योगविज्ञान शिबीराचे 2007 मध्ये कोल्हापूर येथे व 2008 मध्ये सांगली येथे आयोजन केले होते. या उपक्रमाचा लाभ पश्चिम महाराष्ट्रास देशाला व्हावी या उद्देशाने 2009 मध्ये शिवाजी पार्क, मुंबई येथे 'प्रति कोल्हापूर' महोत्सवाचे आयोजन. कोल्हापूर येथे लाखो लोकांच्या उपस्थितीत जेष्ठ समाजसुधारक व निरूपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांना 'सुराज्य फौंडेशन गौरव पुरस्कार' प्रदान सोहळा आदि उपक्रम संस्थमार्फत राबविले गेले.

### *1.9 पर्यटन–वारणा सहकाराचे 'जेकीस' प्रारूप* (GEKIS MODEL)

वारणा विविध उद्योग व शिक्षण समुहातील प्रमुख संस्थांचा व्याप्तीचा आढावा घेतल्यानंतर वारणा सहकार समुह सहकारातील नव्या संकल्पना व संस्थाना जन्म देणारा सहकार समुह असल्याचे सिध्द होते. या समुहातील प्रत्येक संस्थेला स्वतःचे स्वतंत्र्य व्यक्तिमत्व आहे. गेल्या 50 वर्षात वारणा सहकाराचे अनेक प्रयोग महाराष्ट्राबरोबरच देशाच्या सहकार चळवळीला नवी उर्जा देत आहेत. म्हणूनच एक पर्यटन स्थळ म्हणून या ठिकाणचा विचार करताना इतर पर्यटन स्थळांपेक्षा या ठिकाणाला विशेष वेगळेपण आहे. येथे येणारे पर्यटक फक्त मनोरंजनाच्या उद्देशाने येत नाहीत. एकाच वेळी अनेक अपेक्षांची पुर्ती हे पर्यटन स्थळ करते. म्हणूनच बांग्लादेश ऊस उत्पादक संघाचे महम्मद युनूस म्हणतात, 'वारणा परिसरातील विविध क्षेत्रातील विकासाचे कार्य थक्क करणारे आहे. आज हा विकासाचा आदर्श आम्ही घेवून जात आहोत' (मी एक कार्यकर्ता, उत्तरार्ध पा. 42).

पर्यटनाचे वारणा प्रारूप म्हणूनच एक नवे पर्यटन प्रारूप या संदर्भात विचारात घ्यावे लागते. येथे येणाऱ्या पर्यटकांची विभागणी पाच प्रमुख प्रकारात करता येईल. या प्रकारांच्या आधारे या पर्यटन प्रारूपाला 'जेकीस प्रारूप' (GEKIS Model) म्हणता येईल. ते पुढीलप्रमाणे –




### *1) मार्गदर्शन*

वारणा सहकार पर्यटनातील जेकिस प्रारूपातील हा एक महत्वाचा घटक आहे. वारणानगरला दरवर्षी लाखाहून अधिक लोक भेट देतात. यामध्ये मार्गदर्शन घेण्याच्या हेतूने फार मोठया प्रमाणात महाराष्ट्राच्या विविध जिल्हयासह भारताच्या विविध प्रांतातून पर्यटक येत असतात. वारणानगरला मार्गदर्शनाच्या हेतूने भेट देणाऱ्या पर्यटकांमध्ये शेतकऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. वारणा परिसरातील शेतीमध्ये अनेक नवे प्रयोग सातत्याने होत असतात. यामध्ये प्रामुख्याने ऊस उत्पादनाचा समावेश होतो. त्याचप्रमाणे खत, पाणी व पीक व्यवस्थापनाचे अतिशय चांगले नमुने येथे उपलब्ध असल्याने अशा शेतकऱ्यांकडून मार्गदर्शन घेण्यासाठी शेतकरी येत असतात. त्याचबरोबर साखर कारखाना, शेतीपूरक संस्था इ. कडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळा आयोजित केल्या जातात. अशा कार्यशाळांना शेकडो शेतकरी

उपस्थित राहतात.

वारणा परिसरात ऊस उत्पादनाबरोबर दुध व्यवसायही अतिशय मोठा आहे. येथील शेतकऱ्यांकडे जास्त दुध देणाऱ्या गाई–म्हैशी मोठया प्रमाणावर आहेत. त्याचबरोबर आधुनिक पध्दतीने दुध उत्पादन करण्यात येथील शेतकरी यशस्वी झाले आहेत. अशा शेतकऱ्यांकडून हा व्यवसाय कसा फायदेशीर ठरू शकतो याचे मार्गदर्शन घेण्यासाठी विविध जिल्हयातून शेतकरी नियमित येत असतात. त्याचबरोबर काही शेतकऱ्यांचे म्हैस अथवा गाईचे मोठे गोठे ही आहेत. अशा गोठयांमधून 50 ते 100 दुभती जणावरे एकच शेतकरी सांभाळत असतात. असे प्रयोगशील गोठे हे या परिसराचे खास वैशिष्ठ आहेत. उदा. किणी, तळसंदे, पारगांव, कुंभोज आदि गावांमध्ये मोठे गोठे आहेत. अशा शेतकऱ्यांकडे येणाऱ्यांचे प्रमाणही खूप मोठे आहे. त्याचबरोबर वारणा दुध संघाचा पशुवैद्यकिय विभागही अतिशय अद्ययावत आहे. येथील डॉक्टरांकडून शंकानिरसन व मार्गदर्शनासाठी शेतकरी येतात. वारणा कारखान्याची नर्सरी सुध्दा मोठी आहे. येथे ऊस रोपे व फळझाडे मिळतात. या विभागाकडूनही फळबाग लागवडीची माहिती घेण्यासाठी शेतकरी येतात. बचत गटाच्या महिलांसाठी नियमित विविध प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केल्या जातात. याचा लाभ 30,000 महिलांनी घेतला आहे.

याबरोबरच विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी कर्मचारी सुध्दा विविध स्तरांवरील मार्गदर्शन घेण्यासाठी या सहकारी समुहाला भेट देतात. यामध्ये मुख्यतः साखर कारखाना, दुध संघ, वारणा बझार, वारणा बँक या संस्थाकडे येणाऱ्यांची संख्या लक्षणिय आहे.

महाराष्ट्रातील विदर्भ विभागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न गेली अनेक वर्षे महाराष्ट्रात निर्माण झाला आहे. विदर्भातील विविध जिल्हयातील शेतकऱ्यांना शेती व दुग्धविकासाबाबत मार्गदर्शन देण्यासाठी गेल्या तीन वर्षापासून महाराष्ट्र शासनाकडून या जिल्हयातील शेतकऱ्यांच्या 'अभ्यास सहली' वर्षभर वारणानगर येथे येत असतात. आजपर्यंत अशा 5000 शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. जागतिक बँकेचे प्रतिनिधी जॉर्ज रसेल यांचा अभिप्राय उल्लेखनीय आहे. ते म्हणतात, 'लोकांच्या विकासासाठी व कल्याणासाठी सहभाग देऊन सहकारिता इतकी यशस्वी होवू शकते याचा हा पुरावा पाहून मला आनंद वाटला. अत्यंत चांगल्या व समर्पित नेतृत्वामुळेच सहकारातील ही किमया या ठिकाणी घडू शकली (तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव स्मरणिका, पा. 17).

## II) *मनोरंजन*

मनोरंजन हा पर्यटनाचा हा सर्वात लोकप्रिय हेतू आहे. जागतिक पर्यटन व्यवसायाचा विचार करता या हेतूने होणाऱ्या पर्यटनाचे प्रमाण जास्त आहे. वारणानगरला या उद्देशाने येणाऱ्या पर्यटकांची संख्याही अर्थातच मोठी आहे. वारणानगरपासून नजिकच असणारी कोल्हापूर, पन्हाळा व जोतिबा या ठिकाणी येणारे हौशी पर्यटक मोठया संख्येने वारणानगरला भेट देतात. वारणानगर हे अतिशय विकसित असल्याने येथे विविध प्रकारचे बगीचे आहेत. त्याचबरोबर राम, हनुमान, शंकर–पार्वती मंदिर आदि बरोबरच स्मृती उद्यान, संसद भवन प्रतिकृती, सहकार शिल्प यासारख्या बाबी पर्यटकांना आकर्षित करतात.

क्रिडा क्षेत्रातील वारणानगरची ख्याती सर्वत्र आहे. दरवर्षी विविध प्रकारच्या खेळांच्या राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धांचे येथे आयोजन होते. या कालावधीत देशभरातील शेकडो खेळाडू व हजारो क्रिडाप्रेमी येथे येतात. त्याचबरोबर गेल्या अनेक वर्षापासून आंतरराष्ट्रीय कुस्ती मैदान हे देशपातळीवरील एक महत्वाचे कुस्ती मैदान येथे होते. शाहु महाराजांनी कोल्हापूर येथे आंतरराष्ट्रीय कुस्त्यांच्या आयोजनास सुरूवात केली. शाहू महाराजांनंतर खंडीत झालेली ही परंपरा आमदार विनय कोरे (सावकर) यांच्या नेतृत्वाखाली नव्याने सुरू झाली. दरवर्षी वारणानगरच्या आंतरराष्ट्रीय कुस्ती मैदानात पाकिस्तान, जार्जिया, इराण, रशिया, कॅनडा या परदेशी मल्लांबरोबर भारतातील सर्वश्रेष्ठ मल्लही सहभागी होतात. अतिशय दर्जेदार कुस्ती आयोजनामुळे दरवर्षी महाराष्ट्राबरोबरच कर्नाटकातूनही दोन लाखांहून अधिक लोक वारणानगरला भेट देतात.

वारणानगरचे आणखी एक वेगळेपण म्हणजे येथील छोटया मुलांचा 'वारणा बालवाद्यवृंद' या वाद्यवृदांची ख्याती भारताबाहेरही आहे. गेली 40 हून अधिक वर्षे हा उपक्रम येथे सुरू असून 1974 मध्ये त्या वेळच्या भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या उपस्थितीत या बाल वाद्यवृंदाचा कार्यक्रम दिल्ली येथे झाला. त्याचबरोबर मॉरिशसमध्ये दोन वेळा, युगोस्लाव्हिया, दक्षिण आफ्रिका आदी देशांमध्येही या बाल वाद्यवृदांचे कार्यक्रम झाले. हैद्राबादमध्ये आंतरराष्ट्रीय चिल्ड्रन्स फिल्म फेस्टिव्हलमध्येही तो सहभागी झाला. सहयाद्री दूरदर्शनवर या कार्यक्रमाचे सादरीकरण झाले. महाराष्ट्रात मुंबईसह अनेक ठिकाणी कार्यक्रम झाल्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांमध्ये हा कार्यक्रम पहाण्याचे आकर्षण असते. या संदर्भात संगीताचे जाणकार व जेष्ठ साहित्यिक पु.ल.देशपांडे यांनी वारणा बाल वाद्यवृंदाचे कौतुक करताना म्हटले होत 'कुठे ठेवू आणि कुठे नको, असे हया मुलांनी करून सोडले. मला वाटते की हा चिमण्यांचा ताफा जगभर हिंडवून आणायला हवा. वारणा बालवाद्यवृंद वारणानगरचे नव्हे तर साऱ्या भारतीय संगीताचे जग, खूप–खूप सुंदर करणारा आहे' ( मी एक कार्यकर्ता, उत्तरार्ध, पा. 182 व 183 ).

## III) *ज्ञान*

वारणा सहकाराच्या यशाचे रहस्य म्हणजे येथील विकासकार्याचे ज्ञानधिष्ठित अधिष्ठान होय. सहकार चळवळ येथे वाढत असताना विविध क्षेत्रातील ज्ञानी व्यक्तींची भक्कम फळी तात्यासाहेब कोरे यांनी उभारली. त्यामुळेच येथील सहकार इतरांपासुन वेगळा आहे. याचाच परिणाम म्हणून जगभरातील ज्ञानमार्गी लोक येथे सातत्याने भेट देतात. यामध्ये विविध विषयांतील संशोधक, अभ्यासक, लेखक पत्रकार त्याचबरोबर व्यवस्थापन आणि समाजकार्य विषयांचे पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी आदिंचा समावेश आहे. जगातील विविध देशाच्या संशोधकांनी वारणा सहकारावर संशोधन केले. भारतातील व्यवस्थापन क्षेत्रातील नामंकित 'इंडियन इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट', अहमदाबाद येथील डॉ. दत्ता यांनी वारणा बझारबाबत आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन केले आहे. व्यवस्थापन, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, भूगोल, इतिहास आदि ज्ञानशाखांच्या अनेक संशोधकांनी वारणा सहकारावर एम.फिल, पीएच.डी केले आहे. दरवर्षी व्यवस्थापन व समाजकार्य विषयाच्या

अभ्यास सहली वारणानगरला
येतात. त्याचबरोबर अभ्यासक्रमाचा भाग म्हणून अनेक विद्यार्थी येथील अनेक संस्थामध्ये प्रत्यक्ष कार्य अनुभव घेतात.

वारणा महाविद्यालय व अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अतिशय समृध्द ग्रंथालयांना भेट देणाऱ्या अभ्यासकांची संख्याही फार मोठी आहे. त्याचप्रमाणे सुराज्य फौंडेशन या स्वयंसेवी संस्थेकडे केंद्रीय प्रशासकीय सेवा स्पर्धा परीक्षेसंदर्भात ज्ञान व माहिती घेण्यासाठी विविध ठिकाणांहून विद्यार्थी नियमित येत असतात. थोडक्यात ज्ञान मिळविण्याच्या प्रेरणेने होणारे पर्यटन हे ग्रामीण पर्यटन क्षेत्र म्हणून वारणानगरचा विचार करता अत्यंत वैशिष्टयपूर्ण आहे. हे या पर्यटन स्थळाचे बलस्थान आहे. म्हणूनच या संदर्भात फ्रान्स येथील पत्रकार जीन पेझी यांचे उद्‌गार अर्थपूर्ण आहेत. ते म्हणतात, 'वारणानगर म्हणजे सृजनशील कल्पनाशक्तीचा मूर्तीमंत आदर्श आहे' ( मी एक कार्यकर्ता, उत्तरार्ध पा. 42 ).

## IV) *माहिती*

कोणत्याही पर्यटन स्थळाचा विचार करता सामान्य लोकांची जिज्ञानासापूर्ती करण्याची क्षमता त्यामध्ये असणे आवश्यक असते. यामध्ये मुख्यतः हौशी पर्यटकांची संख्या मोठी असते. जिज्ञासापूर्तीसाठी वारणानगरला येणाऱ्या पर्यटकांची संख्या सर्वाधिक आहे. यामध्ये मुख्यतः शाळा व महाविद्यालयांच्या वार्षिक सहलीचा मोठा समावेश आहे. सर्वसाधारणपणे 500 हून अधिक अशा सहली दरवर्षी वारणानगरला येतात. यामध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा तसेच विविध ज्ञान शाखांचे महाविद्यालये यांचा समावेश होतो. साखर, श्रीखंड, तूप तयार करण्याची प्रक्रिया पहाणे हे विद्यार्थ्यांचे खास आकर्षण असते.

कोल्हापूर जिल्हयात पर्यटन स्थळांची संख्या मोठी असल्याने कोल्हापूर जिल्हयात येणारे पर्यटक संख्याही मोठी आहे. यांपैकी बहुतांशी पर्यटक वारणानगरला भेट देतात. अशा पर्यटकांनी वारणा सहकार समूह दाखविण्यासाठी आणि त्या संदर्भात माहिती देण्यासाठी वारणा समूहामार्फत दोन जाणकारांची मार्गदर्शक म्हणून व्यवस्था केली आहे. त्यांच्याकडून पर्यटकांना सर्व माहिती दिली जाते, शंकानिरसनही केले जाते. संपूर्ण वारणा सहकार समूह व्यपस्थित पहाण्यासाठी किमान दोन ते तीन दिवस लागतात. यावरून या पर्यटनस्थळाची व्याप्ती समजून येते.

वारणा भगिनी मंडळ ही महिलांची संस्था दरवर्षी महिलांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थाचे व हस्तकलाचे प्रदर्शन 'आनंद मेळा' आयोजित करते. तीन दिवस चालणाऱ्या या आनंद मेळयास दर दिवशी साधारणतः 20,000 महिला भेट देतात. ग्रामीण परिसराचा विचार करता ही संख्या लक्षणीय असून जवळच्या जिल्हयातूनही अनेक महिला येथे भेट देतात. त्याचबरोबर वारणा बझार या संस्थेमार्फत दरवर्षी आयोजित होणाऱ्या तांदुळ महोत्सवादरम्यान हजारो लोक बझारला भेट देतात. येथे आयोजित होणारी विविध ग्रंथ प्रदर्शने सुध्दा पर्यटकांना आकर्षित करतात.

वारणा साखर कारखाना व शेतीपूरक संस्थेद्वारे आयोजित केली जाणारी शेतीप्रदर्शन तसेच वारणा दुध संघामार्फत आयोजित केले जाणारे जनावरांचे प्रदर्शन या सारख्या कार्यक्रमांसाठीही हजारो पर्यटक वारणानगरला येतात.

## V) *सेवा*

वारणा सहकार समूहाचे ध्येय फक्त शेतकऱ्यांना आर्थिक सुबत्ता मिळवून देणे एवढेच नसल्याने जीवनाच्या सर्व क्षेत्रातील प्रगती हे असल्याने सहकारी कारखानदारी बरोबरच आरोग्य, शिक्षण, शेतीपूरक उपक्रम, विविध जीवनावश्यक वस्तूंची खात्रीशीर उपलब्धता आदि क्षेत्रात येथे भरीव काम झाले. सर्व उपचार एकाच छताखाली या संकल्पनेवर आधारित महात्मा गांधी हॉस्पिटल हे वैद्यकिय पर्यटनाचे केंद्र होवू पहात आहे. या हॉस्पिटलमार्फत विविध वैद्यकिय शिबीरांचे वर्षभर आयोजन होते. यामध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया, सर्व क्षेत्र निदान दंतचिकित्सा आदिंचा समावेश होतो. त्याचबरोबर हॉस्पिटलच्या दंत महाविद्यालयात अत्यल्प दरात उपचार उपलब्ध असल्याने हजारो लोक येथील या सेवेचा लाभ घेतात. त्याचबरोबर ब्लड बँकेच्या माध्यमातूनही अनेकांचा लाभ होतो.

1965 पासूनच वारणानगर हे एक शैक्षणिक केंद्र म्हणून महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. सुरूवातीच्या काळात वारणा महाविद्यालयात आसाम, मेघालय अशा राज्यातील विद्यार्थी प्रवेश घेत होते. ग्रामीण परिसरातील 'गुरूकुल' पध्दतीची निवासी शाळा 1969 मध्ये सुरू झाली. भारतातील ग्रामीण परिसरातील बहुधा ही पहिलीच शाळा असावी. स्थापनेपासून आजअखेर संपूर्ण महाराष्ट्रातून विद्यार्थी येथे प्रवेश घेतात. 1984 मध्ये स्थापन झालेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये संपूर्ण देशातून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. शिक्षणाच्या निमित्ताने वारणानगरला येणाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे.

याबरोबरच वारणा कारखान्याच्या नर्सरीमधून विविध फळझाडे–रोपे व टिश्यू कल्चर्ड ऊस रोपे नेण्यासाठी कोल्हापूर बरोबर सांगली, सातारा जिल्हयातील हजारो शेतकरी येतात. वर्षाला अंदाजे 23,000 फळझाडे व 1,50,000 ऊस रोपे येथून खरेदी होतात. वारणा बझार ही ग्राहक संस्था लोकांना दर्जेदार वस्तू व सेवा रास्त दरात मिळवून देण्यासाठी स्थापन झाली. येथील बियाणे, खते, किटकनाशके, शेती अवजारे त्याचबरोबर इतर जीवनावश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी मोठया प्रमाणात लोक येतात.

वरील पाच घटकांच्या आधारे वारणानगर येथे येणाऱ्या पर्यटकांचा अभ्यास करता पर्यटकांना सर्व काही 'एकत्र देणारे' पर्यटनाचे हे जेकिस प्रारूप एक परिपूर्ण पर्यटन स्थळ म्हणून विचारात घ्यावे लागते. दूरदृष्टीच्या विकासनियोजनातून अशा प्रकारचे पर्यटन स्थळ विकसित होण्याची देशातील बहुधा हे पहिलेच उदाहरण असेल. वारणानगरला भेट देणाऱ्या पर्यटकांची अधिकृत आकडेवारी उपलब्ध नसली तरी साधारणतः 600 सहली, 1,25,000 पर्यटक आणि देश विदेशातील जवळ–जवळ 1000 अतिमहत्वाच्या व्यक्ति दरवर्षी येथे भेट देतात. यावरून एक पर्यटन स्थळ म्हणून या ठिकाणाचे महत्व अधारेखित होते.

वारणा परिसरात पर्यटन व्यवसायाच्या विकासातून शेकडो लोकांना रोजगार संधी उपलब्ध झाल्या. यामध्ये खानावळ, हॉटेल, दुकाने,

वहातुक आदि क्षेत्राला फार मोठी चालना मिळाली. लोकांचे जीवनमान सुधारण्यामध्ये मोठे यश मिळाले.

### *1.10 वारणा सहकार पर्यटन प्रारूप – विकासासाठीचे पर्याय*

1) वारणा सहकार समूहाने आपले 'माध्यम धोरण'(Media Policy) आखावे. यामध्ये विकसित सर्व माध्यम साधनांचा आपली 'प्रतिमा' उभारण्यामध्ये कौशल्याने उपयोग करून घ्यावा.
2) माध्यम धोरणाबरोबरच 'पर्यटन धोरण' तयार करावे. यामध्ये पर्यटकांना आकृष्ट करून घेण्याची योजना, एखादे 'सहकार वस्तू संग्राहलय' आदि योजना आखणे, मार्गदर्शकांना प्रशिक्षण, विविध माध्यमातून समूहाच्या वेगळेपणाचे सादरीकरण, रोजगार निर्मितीचे एक साधन म्हणून योजना आदि बाबींचा विचार करावा.
3) वारणानगरचे खास आकर्षण असणाऱ्या वारणा वाद्यवृंदाचा विकास करून ते अद्ययावत करणे. कार्यक्रमाच्या सीडी तयार करून विक्रिसाठी उपलब्ध करून देणे.
4) समूहाचे एकत्रित 'माहिती व सेवा केंद्र' विकसित करून अभ्यासकांना व जिज्ञासूंना समूहाबाबत अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणे. विविध माहिती पत्रके, छोटया पुस्तिका तयार करणे इ.
5) 'कृषी पर्यटन' उद्योग सध्या जगभर झपाटयाने विकसित होत आहे. वारणा परिसरात या उद्योगाच्या विकासाला प्रचंड संधी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना एक उद्योग म्हणून कृषी पर्यटनासाठी प्रोत्साहित करावे.
6) वारणानगर येथे अद्ययावत हॉटेल्स विकसित करणे आवश्यक आहे.
7) देश–विदेशातील विविध खाजगी तसेच शासकीय पर्यटन संघटनांकडे नोंदणी करून या ठिकाणाला पर्यटन उद्योगाच्या मुख्य प्रवाहात आणणे.

### *1.11 समारोप*

वारणा सहकारी विविध उद्योग आणि शिक्षण समुहाच्या माध्यमातून तयार झालेजे सहकार पर्यटन प्रारूप ( जेकिस ) हे पर्यटन उद्योग क्षेत्रातील एक नाविण्यपूर्ण प्रारूप आहे. बहुतांशी पर्यटन स्थळे एक किंवा दोन घटकांसाठी प्रसिध्द असतात. अशावेळी समिश्र पर्यटकांना असे पर्यटन स्थळ आनंद देवू शकत नाही. याउलट वारणानगर हे सर्व वयोगटातील व सर्व स्तरातील स्त्री–पुरूषांच्या अपेक्षापूर्ती करणारे पर्यटन स्थळ आहे. एक पर्यटन स्थळ म्हणून आवश्यक सर्व बाबी या ठिकाणी आहेत. त्याचबरोबर पूरक पर्यटन विकासालाही भरपूर संधी आहे. नियोजनबध्द पध्दतीने, एक पर्यटन स्थळ म्हणून या ठिकाणाचा विकास करण्याची आवश्यकता आहे. यातून स्थानिक रोजगार निर्मिती तसेच आर्थिक वृध्दीसाठी हा एक उत्तम पर्याय ठरेल.

या अनुषंगाने सुचविलेले उपाय विचारात घेतले तर देशातील एक श्रीमंत पर्यटन स्थळ म्हणून भविष्यात या ठिकाणाचा लौकिक निर्माण होवू शकतो. या ठिकाणाची मर्यादापेक्षा बलस्थाने प्रभावी आहेत. असे असले तरी येणाऱ्या कालखंडात इतर क्षेत्रात रोजगाराच्या संधी कमी होत असताना पर्यटन क्षेत्र मात्र या बाबतची फार मोठी क्षमता राखून आहे. वारणा सहकाराने या क्षमतांचा विकास केला तर सहकाराच्या माध्यमातून एक नवे क्षेत्र विकसित होवू शकते.

### *संदर्भ*


1) कोरे, तात्यासाहेब (1990) : मी एक कार्यकर्ता ' (आत्मचरीत्र), वारणानगर,तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समिती.
2)कोरे, तात्यासाहेब (1990) : ' अमृत तरंग ' (निवडक भाषण संग्रह), वारणानगर, तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समिती.
3 )तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव स्मरण्किा, (1990) : वारणानगर, तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समिती.
4)आपला महाराष्ट्र परंपरा व प्रगती (1985) : महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई
5) A Brief note on Warna complex, manudcript published by warana complex.
6)Annual Report,(50 and 51),2005-06 and 2006-07,Tatausaheb Kore Warana Cooperative Sugar Factory.
7)Annual Report,(41), 2008-09, Warana Cooperative Dudha Sangh.
8) Warana- A Mission With a Message Sweet Success of Cooperative Strenhth,Shri Warana Vividha Udyog and Shilkshan Samuh, Warananagar.
9) Tourism Policy of Maharashtra (2006) – Department of Tourism And Cultural Affairs, Government of Maharashtra, Mumbai.
10)Indian Tourism Statistics (2003), Ministry of Tourism, Govt. of India, Delhi.
11)Gopal, R, Varma, Shilpa, Gopinathan, Rashmi (2008) – A Research Paper on 'Rural Tourism Devlopment :Constraints and Possibilities weth a special reference to Agri Tourism a Case Study on Agri Tourism Destination-Melegaon, Tal. – Baramati, Dist- Pune.
12) Kumbhar Vijay Maruti, Agro- Tourism : Scope and Opportunities for the Farmers in Maharashtra, Indiastat.com Sept-Oct, 2009
13)Manorama Year Book – 2009
14) WWW.mah.nic.in

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net